पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १७७**

**सभावृत्तांत**

दिनांक – **०७/०७/२०१५** वेळ – **सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक **०७/०७/२०१५** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**

२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

३) मा.तरस बाळासाहेब जयवंत

३) मा.प्रसाद शेट्टी

४) मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम

६) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८) मा.काळे विमल रमेश

९) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार

१०) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.भोसले-मुख्य लेखापाल,मा.गावडे-सहआयुक्त,मा.पाटील,मा.चव्हाण,मा.तुपे–सह शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डोईफोडे,मा.कडूसकर,मा.गायकवाड,मा.माने,मा.खांडकेकर,मा.दंडवते,मा.माछरे,मा.फुंदे,मा.दुरगुडे, मा.खोसे-सहा.आयुक्त,मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण,मा.कपिले,मा.थोरात,मा.पठाण,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.गलबले, मा.घोडे, मा.केदारी,मा.गट्टूवार, मा.शेख-कार्यकारी अभियंता,मा.बोदाडे,मा.बेंडे-प्रशासन अधिकारी,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले –**

विषय क्रमांक-३९) प्रभाग क्र.६० मधील विकास कामांसाठी मे.पेव्हटेक कन्सल्टंट यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत – मा.रमा ओव्हाळ, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४०) स्वच्छ भारत अभियान (नागरी) व स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी (स्वच्छ पिंपरी चिंचवड मनपा) अंतर्गत हागणदारी मुक्त शहरासाठी वैयक्तिक शौचालय बांधणेकामी अनुदान देणेबाबत...

| | |
|---|---|
| विषय क्रमांक-४१) | सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत-मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४२) | सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक तरतूद वर्ग करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४३) | स्थापत्य अ क्षेत्रिय कार्यालयाचे तरतुद वर्गीकरण करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४४) | स्थापत्य क क्षेत्रिय कार्यालयाचे तरतुद वर्गीकरण करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४५) | स्थापत्य क क्षेत्रिय कार्यालयाचे तरतुद वर्गीकरण करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४६) | सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील फ प्रभाग (मुख्यालयातील) कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत-मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४७) | ब प्रभागातील सन २०१५-१६ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४८) | सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील फ प्रभाग (मुख्यालयातील) कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-४९) | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कार्यक्षेत्रातील विकास कामांसाठी सल्लागार/ वास्तुविशारद नेमणूक करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-५०) | इ क्षेत्रिय (प्रभागातील) कार्यालयातील भोसरी उपविभागातील टाक्यांवरुन पाणीपुरवठा करण्यासाठी मजुर पुरविणे (२०१४-१५) या कामास मुदतवाढ व तरतुद वर्गीकरणास मान्यता मिळणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-५१) | तरतुद वर्गीकरणाबाबत-मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-५२) | हस्ताक्षर सुधारणा प्रकल्पाबाबत - मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-५३) | फ क्षेत्रीय कार्यालय मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदापत्रकामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-५४) | मा.स्थायी समिती ठराव रद्द करणेबाबत – मा.बाळासाहेब तरस, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक-५५) | ठराव रद्द करणे व तरतूद वर्गीकरण करणेबाबत–मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव... |

--------

दिनांक ३०/०६/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक – ११९३०    विषय क्रमांक – १
दिनांक – ०७/०७/२०१५    विभाग – उद्यान
सुचक –मा.रमा ओव्हाळ    अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/२३३/२०१५ दि.१३/३/२०१५
विषय – म.न.पा.चे आई उद्यान (दापोडी) देखभाल कामाबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९३१    विषय क्रमांक – २
दिनांक – ०७/०७/२०१५    विभाग – उद्यान
सुचक –मा.सविता साळुंके    अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/२३२/२०१५ दि.१३/३/२०१५
विषय – म.न.पा.चे कै.हरीभाऊ दिनाजी वाघेरे उद्यान देखभाल कामाबाबत...

विषय क्रमांक २ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९३२    विषय क्रमांक – ३
दिनांक – ०७/०७/२०१५    विभाग – स्थापत्य
सुचक –मा.प्रसाद शेट्टी    अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३क/कावि/२३२/१४ दि.१५/३/२०१४
विषय - प्रभाग क्र.३१ दिघी व इत्यादी ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराईज मशिनरीने कारवाई करणेबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार दिनांक ११/८/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९३३    विषय क्रमांक – ४
दिनांक – ०७/०७/२०१५    विभाग – स्थापत्य
सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे    अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/२५१/२०१४ दि.२०/५/२०१४
विषय - अ प्रभागातील अतिक्रमण कारवाईसाठी लागणा-या उंच इमारती पाडणेसाठी यंत्र सामग्री पुरविणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार दिनांक ११/८/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९३४    विषय क्रमांक – ५
दिनांक – ०७/०७/२०१५    विभाग – स्थापत्य
सुचक – मा.संपत पवार    अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/३क/कावि/४४/१५ दि.२०/२/२०१५
विषय - प्र.क्र५८ इत्यादी ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराईज मशिनरीने कारवाई करणेबाबत...

विषय क्रमांक ५चा विचार दिनांक ११/८/२०१५ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९३५ विषय क्रमांक – ६

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी-३/कावि/४९०/२०१५ दि.१६/३/२०१५

विषय – मानसेवी पी.जी.टिचर्सच्या नेमणुकीबाबत...

विषय क्रमांक ६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९३६ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/३इ/कावि/२९/२०१५ दि.१५/४/२०१५

विषय - प्र.क्र.७ च-होली दर्गा ते पठारेमळा २४ मी. रस्त्यावर कलवर्ट बांधणेबाबत...

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९३७ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/१६४/२०१५ दि.०९/०६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या नेत्ररोग विभागाचे विभागप्रमुख यांनी मागणी केलेनुसार, नेत्ररोग-ओटी विभागातील Carl Zeiss कंपनीचे २ मायक्रोस्कोपचे AMC करणेकामी संबंधित कंपनीचे अधिकृत सर्व्हिस प्रोव्हायडर मे.आस्टीन हेल्थ केअर, पुणे यांनी सादर केलेले दरपत्रक एकूण र.रु.५५,६२९/- स्विकृत करणेत आले आहे. नेत्ररोग-ओटी विभागातील Carl Zeiss कंपनीचे २ मायक्रोस्कोपचे AMC संबंधित कंपनीचे अधिकृत सर्व्हिस प्रोव्हायडर मे.आस्टीन हेल्थ केअर, पुणे यांचेकडून करणे, सदर AMC साठी आवश्यक र.रु.५५,६२९/- मे.आस्टीन हेल्थ केअर, पुणे यांना आगाऊ / Advance देणेबाबत तसेच सदर AMC साठी होणारे एकूण र.रु.५५,६२९/- (अक्षरी र.रू. पंचावन्न हजार सहाशे एकोणतीस) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९३८ विषय क्रमांक – ९

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/५५/२०१५ दि.११/६/२०१५

विषय - प्र.क्र.७ च-होली पुणे आळंदी रस्ता ते खाणीचा रस्ता डांबरी करणेबाबत...

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९३९ विषय क्रमांक – १०

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – क क्षेत्रिय स्थापत्य

सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कक्षे/कावि/२१७१/१५ दि.११/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.४१ गांधीनगर येथील पिंपरी चौकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास उतरण्यास शिडी (जिना) करणेचे काम निविदा क्र.२५/०६/२०१३-१४ अन्वये सध्या चालू आहे. सदर कामाअंतर्गत पुतळ्यास आर.सी.सी. मध्ये शिडी करणेत येणार आहे. प्रस्तुत काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा उद्यानामधील असून सदर ठिकाण हे पूर्वीच्या खाणीच्या ठिकाणी असलेने पाया खोदताना खाणीतील भराव मोठया प्रमाणामध्ये काढावा लागल्याने तसेच त्यानुसार आर.सी.सी. डिझाईन करावे लागल्याने कामाच्या खर्चामध्ये वाढ झाली आहे. तसेच वास्तुशास्त्रज्ञाकडील नियोजित भिमसृष्टीच्या डिझाईननुसार शिडी (जिना) चढण्याकरिता व उतरणे करिता वेगवेगळी बनवावी लागले मुळे मुळ अंदाजपत्रकामध्ये वाढ झालेली आहे. सद्यस्थितीत काम ३५ % पुर्ण झाले असुन प्रगतीपथावर आहे. त्यामुळे सदर कामाचे अंदाजपत्रकास सुधारित मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याकामी सुधारित अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०१२-१३ च्या दरसुचीनुसार काढणेत आले असून त्याची अंदाजपत्रकीय र.रु. ४८,५०,०००/- इतकी येत आहे. तरी विषयांकित कामासाठी येणा-या सुधारित र.रु.३६,५०,०००/- (अक्षरी र.रू.छत्तीस लाख पन्नास हजार) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९४० विषय क्रमांक – ११

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/३८०/१५ दि.२/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/१५-२०१४-१५ मधील अ.क्र.०४ अन्वये, से.क्र.२२ प्रभाग क्र.१२ कै.मधूकर पवळे हायस्कुल परिसरातील झोपडपट्टीमध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.सिध्दार्थ कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.३७,३१,३५९/- (अक्षरी र.रु. सदोतीस लाख एकतिस हजार तीनशे एकोणसाठ फक्त) पेक्षा ४८% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१९,४०,३०७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९४१ विषय क्रमांक – १२
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/३८१/१५ दि.२/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/१५-२०१४-१५ मधील अ.क्र.१३ अन्वये, से.क्र.२२ प्रभाग क्र.१२ येथील विलासनगर परिसरात स्थापत्य विषयक कामांची दुरुस्ती करणेकामी मे.सिध्दार्थ कंन्स्ट्रक्शन (नि.र.रु.३७,३०,१७९/- (अक्षरी र.रु.सदोतीस लाख तीस हजार एकशे एकोणऐंशी फक्त) पेक्षा ४८% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रु.१९,३९,६९३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९४२ विषय क्रमांक – १३
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – वाय.सी.एम. रुग्णालय रक्तपेढी
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.YCM/पीजी-१ रक्तपेढी/४७३/१५ दि.५/६/२०१५
विषय - मनपाचे वाय.सी.एम. रुग्णालय येथे नव्याने झालेल्या रक्तपेढीसाठी दर निश्चितीबाबत...

विषय क्रमांक १३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९४३ विषय क्रमांक – १४
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/५४९/२०१५ दि.१६/६/२०१५
विषय - पिंपरी चिंचवड मनपा मुख्य इमारतीमधील कॉरीडॉर, अंतर्गत व बाह्य परिसराची यांत्रिक पध्दतीने तसेच मनुष्यबळाव्दारे दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणे कामकाजास मुदतवाढीबाबत...
निविदा नोटीस क्र.२/२०१३-१४

विषय क्रमांक १४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९४४ विषय क्रमांक – १५
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/३९१/२०१५ दि.१६/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/१५-२०१४-१५ मधील अ.क्र.३ अन्वये, प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर झोपडपट्टीतील संडास ब्लॉक नं.४ (८ सिट्स) पाडून २६ सिट्सचे शौचालय

बांधणेकामी मे.साई एन्टरप्रायजेस वाघमारे (नि.र.रु ३२,५८,२००/- (अक्षरी र.रु.बत्तीस लाख आठ्ठावन्न हजार दोनशे फक्त) पेक्षा ३.४९% जास्त) या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.३३,७१,९११/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा /वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९४५ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/५८३/२०१५ दि.२९/५/२०१५
विषय - मनपाचे मुख्यलेखापरिक्षण विभागासाठी आवश्यक युपीएस साहित्य खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक १६ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९४६ विषय क्रमांक – १७
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/५८४/२०१५ दि.२९/५/२०१५
विषय - मनपाचे मुख्यलेखापरिक्षण विभागासाठी आवश्यक प्रिंटर साहित्य खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक १७ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९४७ विषय क्रमांक – १८
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/५८७/२०१५ दि.१७/६/२०१५
विषय - मनपाचे करसंकलन विभागासाठी Currency Notes Counter Cum Fake Notes Detector Machine साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक १८ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९४८ विषय क्रमांक – १९
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – ब क्षेत्रिय कार्यालय आरोग्य
सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षेका/५/कावि/४९०/२०१५ दि.२५/६/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब क्षेत्रिय कार्यालय आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१४-१५ अन्वये, ब क्षेत्रिय कार्यालय, आरोग्य विभागाकडील संपुर्ण परिसरातील औष्णीक धुरीकरण कामकाज करण्यासाठी आवश्यक

डिझेल रिक्षा टेम्पो (वाहन चालकासह) भाड्याणे घेणेकामी मे.समृध्दभारत स्वयं.सेवा सह संस्था मर्या. यांनी दिलेला दर प्रती वाहन प्रती दिन ७००/- इतका सर्वात लघुत्तम असल्याने स्विकारणेबाबत क्षेत्रीय अधिकारी यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.समृध्द भारत स्वयं. सेवा सह संस्था मर्या यांना कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

(नि.र.रु.७,२०,०००/-(अक्षरी र.रु. सात लाख वीस हजार)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९४९ विषय क्रमांक – २०

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – ब क्षेत्रिय कार्यालय आरोग्य

सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षेका/आरोग्य/५/कावि/४८८/२०१५ दि.२५/६/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब क्षेत्रिय कार्यालय आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१५-१६ अन्वये, ब क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्टॉर्म वॉटर चेंबर्स साफसफाई करून गाळाची वाहतूक करणेकामी मे.श्री जगन्नाथ महिला स्वयं. सेवा सह. संस्था मर्या. यांनी दिलेला दर प्रती चेंबर र.रू.२०९.९९ इतका सर्वात लघुत्तम असल्याने स्विकारणेबाबत क्षेत्रीय अधिकारी यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.श्री जगन्नाथ महिला स्वयं. सेवा सह. संस्था मर्या यांना कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे. (नि.र.रु.८,९३,४१२/- (अक्षरी र.रु.आठ लाख त्र्यान्नव हजार चारशे बारा)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९५० विषय क्रमांक – २१

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/८९/२०१५ दि.२६/६/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१५.६.२०१५ ते दि.२१.६.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/८९/२०१५ दि.२६.६.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९५१ विषय क्रमांक – २२

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/१४३/१५ दि.२५/६/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३४/२०१४-१५ मधील अ.क्र.२ अन्वये, प्र.क्र.४६ पिंपरी काळेवाडी मुख्य रस्त्याला आठवण हॉटेल ते बी.आर.टी.एस. रस्त्या पर्यंत डिव्हायडर बसविणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.के.पी.कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.२०,५३,९८१/- (अक्षरी र.रू.वीस लाख त्रेपन्न हजार नऊशे एक्याऐंशी) पेक्षा ४१.९९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१२,५१,०९०/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या

निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९५२ विषय क्रमांक – २३

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/१४२/१५ दि.२५/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५०/२०१४-१५ मधील अ.क्र.२ अन्वये, प्र.क्र.५७ पिंपळेगुरव मधील मनपाच्या ताब्यात आलेल्या आरक्षणांसाठी सिमाभिंत बांधणे व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन (नि.र.रु. ३५,०१,४०१/- (अक्षरी र.रू.पस्तीस लाख एक हजार चारशे एक) पेक्षा ३३.३९% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२४,४८,८९७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९५३ विषय क्रमांक – २४

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य

सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/स्था/कावि/६३५/२०१५ दि.२९/९/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत १) प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील वाचनालय, अभ्यासिका बांधणे, सुशोभिकरण करणे २) प्रभाग क्र.९ संभाजीनगर बहिरवाडे मैदान येथे जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळ केंद्र बांधणे ३)आकुर्डी जी ब्लॉक मधील साई उद्यान व अम्ब्रला उद्यान येथे दुरूस्ती व विकासाची कामे करणे (स्थापत्य विषयक कामे करणे, शेड उभारणे, गझेबो करणे, माळी हाऊस करणे इत्यादी) या कामासाठी महानगरपालिका पॅनल वरील मे.सचिन आपटे अँण्ड असोशिएट्स चिंचवड पुणे यांची वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेस व त्यांनी केलेल्या कामासाठी होणारी फी (अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २% सर्व करासह) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९५४ विषय क्रमांक – २५
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/५/कावि/२१३/२०१५ दि.२६/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दि.१०/४/२०१५ ते ३०/४/२०१५ या कालावधीत मनपाच्या प्रभाग समिती अध्यक्षांची निवडणूक, प्रशासन विभागामार्फत घेण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता व स्थापत्य सहाय्यक या पदांचे परिक्षेच्या पेपरचे स्कॅनिक करताना घेण्यात आलेले व्हिडीओ शुटिंग तसेच महाराष्ट्र शासनातर्फे राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता व अभियान स्पर्धा २०१३ अंतर्गत मनपाचे सारथी हेल्पलाईन प्रथम पुरस्कार सोहळ्याचे व्हिडीओ शुटिंगचे मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी, सांगवी, पुणे-२७. यांच्याकडून मा.स्थायी समितीने ठराव क्र.११४७५ दि.१२/४/२०१५ चे मान्य दरानुसार काम करुन घेण्यात आलेले आहे. त्याकरीता र.रु. ८,३००/- (अक्षरी र.रु.आठ हजार तिनशे फक्त) इतका खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९५५ विषय क्रमांक – २६
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/५१५/२०१५ दि.२९/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा दैनंदिनी २०१५ चे पुरवठाधारक मे.व्ही.एम.शिंदे, प्रिंटर्स ऍन्ड सप्लायर्स, जुनी सांगवी यांनी दि.२७/०३/२०१५ चे पत्रान्वये मनपा दैनंदिनी २०१५ छपाई कामी जादा पाठपोठ ३६ पाने छपाई केलेचे बिल र.रु.६०,४८०/- मिळणेबाबत मागणी केलेली आहे. मनपा विविध विभागास आवश्यक मनपा दैनंदिनी २०१५ छपाई कामी ई-नि.सु.क्र. २६/२०१४-१५ अन्वये निविदा मागविणे आल्या होत्या. प्राप्त लघुत्तम दरानुसार दैनंदिनी छपाईस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे.व्ही.एम.शिंदे, जुनी सांगवी यांचेकडुन मनपा दैनंदिनी २०१५ छपाई करुन घेणेत आलेली आहे. सदर दैनंदिनी २०१५ मधील जादा छपाई झालेली ३६ (२,५२,००० पाने) पाठपोठ पानांचे प्रती पान र.रु.०.२४ पैसे प्रमाणे ७,००० नग दैनंदिनी साठी र.रु.६०,४८०/- एवढा जादा खर्च आलेला आहे. प्रस्तुतकामी आलेल्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९५६ विषय क्रमांक – २७
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/५४७/२०१५ दि.२९/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे आरोग्य विभागासाठी साफसफाई साहित्य खरेदीकामी निविदा सुचना क्र ५/२०१५-१६ अन्वये ऑनलाईन प्रसिध्द करणेत आली होती. प्राप्त निविदेमधिल १)मे.कापसे एटरप्राईजेस याचे बाब क्र. १ साठी प्रति नग ८.५० प्रमाणे एकुण र.रु २,००,९४०/- २)मे.साईराज एंटप्राईजेस पुणे यांचे बाब क्र. २ साठी प्रति नग र.रु ५१.७५ प्रमाणे एकुण र.रु.६,११,६८५/- ३)मे.प्राईंम सर्जिकल अँन्ड फार्मा य़ांचे बाब क्र.३

साठी प्रति नग र.रु.२३.४८ प्रमाणे एकुण र.रु.५,५५,०६७.५ असे एकुण र.रु १३,६७,६९२/- (अक्षरी र.रू.तेरा लाख सदुसष्ट हजार सहाशे ब्यान्नव) प्राप्त लघुत्तम दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास तसेच त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९५७ विषय क्रमांक – २८

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/१८०/२०१५ दि.२९/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या विविध विभाग/वार्डासाठी आवश्यक B.P.Apparatus–Manual खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्र.०४/२०१५-१६ अन्वये दरपत्रके मागविणेत आले होते. त्यानुसार मे.गॅब एंटरप्रायजेस, पिंपरी यांनी सादर केलेला दर र.रु.१,९९०/- प्रती नग (सर्व करांसह) लघुत्तम प्राप्त झाला असुन स्विकृत करणॆत आला आहे. मे.गॅब एंटरप्रायजेस, पिंपरी यांचेकडून त्यांनी सादर केलेला दर र.रु.,१९९०/- प्रती नग (सर्व करांसह) प्रमाणे ५० नग B.P.Apparatus–Manual करारनामा न करता खरेदी करणेस व सदर खरेदीस होणारा खर्च र.रु.९९,५००/- ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९५८ विषय क्रमांक – २९

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/१८१/२०१५ दि.२९/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या ओटी विभागातील नादुरुस्त C-Arm मशीन Sr.No.V11109057 मशीन दुरुस्त करणेकामी संबंधित मशीनचे अधिकृत पुरवठाधारक/सर्व्हिस प्रोव्हायडर मे.मनाली एंटरप्रायजेस, पिंपरी यांनी आवश्यक त्या साहित्याचा/स्पेअर पार्टसचा पुरवठा करुन संबंधित मशीन दुरुस्त (AMC कालावधीत) करुन दिले असुन मे.मनाली एंटरप्रायजेस, पिंपरी यांना त्यांनी संबंधित मशीन दुरुस्तीचे बील एकूण ररु.२,६६,३००/- (अक्षरी र.रू. दोन लाख सहासष्ठ हजार तीनशे फक्त) (सर्व करांसहीत) अदा करणे आवश्यक असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९५९ विषय क्रमांक – ३०

दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/१४४/१५ दि.१/७/२०१५

विषय - ड प्रभागाअंतर्गत अतिक्रमण विरोधी कारवाईसाठी ट्रक, क्रेन, जे.सी.बी. इत्यादी भाडेतत्वावर पुरविणेबाबत...

विषय क्रमांक ३०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९६० विषय क्रमांक – ३१
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/५१७/२०१५ दि.३०/०६/२०१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विविध विभागासाठी आवश्यक पेपर ए ४ व लिगल कागद, कंपनी बल्लारपुर मिल पॅक रिम साहित्य खरेदीबाबत कोटेशन नो.क्र.११/२०१५-१६ अन्वये बंद पाकीटात दरपत्रक मागविणेत आले होते. त्यानुसार एकुण ०३ कोटेशन नोटीस दरपत्रक प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दरपत्रकातील लघुत्तम कोटेशनधारक मे.धर्मे एंटरप्रायजेस, चिंचवड यांचे पेपर रिम खरेदीकामी एकुण र.रु.१,७९,५००/- (अक्षरी र.रु.एक लाख एकोणऐंशी हजार पाचशे फक्त) चे दर स्विकृत करणेत आले असुन त्यांचेबरोबर करारनामा करणेत आलेला आहे. प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९६१ विषय क्रमांक – ३२
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१५२/१५ दि.१/७/२०१५

विषय - प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील संभाजी चौक ते म्हाळसाकांत चौकापर्यंतचा रस्त्यास IRS प्रमाणे फुटपाथ तयार करणे व अनुषंगिक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक ३२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९६२ विषय क्रमांक – ३३
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – फ क्षेत्रिय कार्यालय
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फ क्षेत्रीय/आ/३/कावि/७८४/२०१५ दि.३०/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या फ क्षेत्रिय कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१५-२०१६ अन्वये, फ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील कचरा, रस्त्याच्या कडेस व व सार्वजनिक ठिकाणी साठणारा कचरा, रोजचे रोज उचलून वाहतुक करून महानगरपालिकेच्या मोशी कचरा डेपो येथे टाकणे व स्थानांतरण केंद्र भोसरी येथे टाकणेसाठी प्रती वाहन दोन खेपा (इंधनासह) + ४ मजुर एकूण ५ वाहनांकडून १० खेपा प्रती दिन नेऊन टाकणे व पसरवून देणे कामी मे.आदर्श स्वयं सेवी संस्था (नि.र.रू.६७,०३,२२५/- (अक्षरी र.रू.सदुसष्ट लाख तीन हजार दोनशे पंचवीस) या ठेकेदाराची निविदा, रक्कमेच्या दरापेक्षा १४.८२% व ६.५१% कमी असल्याने म्हणजेच प्रतीदिन दोन खेपा मोशी कचरा डेपो र.रू. ३,१२९/- व स्थानांतरण केंद्रसाठी र.रू.३,११९/- असल्याने, निविदा स्विकारणेबाबत मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ११९६३ विषय क्रमांक – ३४
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह
सुचक –मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रेक्षा/कावि/१६६/२०१५ दि.२/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील होणा-या विविध कार्यक्रमांच्या वेळी व्दारपालन सेवा पुरविणेचा कामाचा ठेका देणबाबतची ई-नि.नो.क्र.१/२०१४-१५ ही वर्तमानपत्रात तसेच मनपाचे वेबसाईटवर प्रसिध्द करून ऑनलाईन ई-निविदा दरपत्रके मागविणेत आलेली होती. ई-नि.नो.क्र.१/२०१४-१५ अन्वये एकूण दोनच ई-निविदा प्राप्त झाल्या असून प्राप्त झालेल्या ई-निविदा मध्ये मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित चिंचवड यांचा र.रू.२१५/- प्रती प्रयोग असा दर सर्वात कमी असल्याने ३३ महिने कालावधीसाठी व्दारपालन सेवा करणेबाबत मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित चिंचवड यांना प्रेक्षागृहातील ३३ महिने कालावधीसाठी र.रू.२१५/- प्रती प्रयोग या दराने व्दारपालन सेवा ठेका देणेस तसेच त्यास होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९६४ विषय क्रमांक – ३५
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.संपत पवार अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट
संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/६३/२०१५ दि.२/७/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४५/२०१४-१५ मधील अ.क्र.३ अन्वये, प्र.क्र.६ मध्ये किरकोळ दुरुस्तीची व देखभालीची कामे करणेकामी मे.लालदिप कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.२३,३१,०५४/- (अक्षरी र.रू.तेवीस लाख एकतीस हजार चोपन्न) पेक्षा ४२.३०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१४,१२,२६९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९६५ विषय क्रमांक – ३६
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक –मा.बाळासाहेब तरस
संदर्भः- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/७६९/२०१५ दि.२/७/२०१५

मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९६६ विषय क्रमांक – ३७
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – जेएनएनयुआरएम
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जेएनएनयुआरएम/०३/कावि/१८४/२०१५ दि.२/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

केंद्र शासनामार्फत लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी, स्वच्छ, शाश्वत व पर्यावरण पूरक शहरे तयार करण्यासाठी "स्मार्ट सिटी अभियान" या महत्वकांक्षी अभियानाची घोषणा मा. पंतप्रधान महोदयांच्या हस्ते दि.२५/६/२०१५ रोजी करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनामार्फत सदर योजनांच्या अंमलबजावणीबाबत दि.२५/६/२०१५ ते दि.२६/६/२०१५ या कालावधीत दोन दिवसीय कार्यशाळा विज्ञान भवन, नवि दिल्ली येथे आयोजित करणेत आली होती. सदर कार्यशाळेमध्ये स्मार्ट सिटी योजनेच्या मार्गदर्शक सुचना प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत. तसेच केंद्र शासनाने त्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना (हिंदी व इंग्रजीGuidelines)केंद्र शासनाचे Ministry of Urban Development चे वेबसाईट www.smartcities.gov.in वर प्रसिध्द केलेल्या असून, सदर कार्यशाळेस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मा.महापौर व मा.आयुक्त आणि जेएनएनयुआरएम समन्वयक उपस्थित राहीले होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा या योजनेमध्ये सहभाग होण्यासाठी मार्गदर्शक सुचनां (Guidelines) नुसार निकषांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाने घोषित केलेल्या स्मार्ट सिटी अभियानाचा कालावधी पाच वर्षाचा आहे. (आर्थिक वर्ष २०१५-१६ ते २०१९-२०) ही देशातील १०० शहरांसाठी र.रू.४८००० कोटींची केंद्र शासन पुरस्कृत योजना आहे. या योजनेत प्रत्येक पात्र शहराला पाच वर्षाचे कालावधीत अंदाजे र.रू.५०० कोटींचे केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त होणार असून त्यास राज्य शासन/महानगरपालिका यांना स्वहिस्सा अंदाजे र.रू.५०० कोटी द्यावा लागणार आहे. अभियानाचे पाच वर्ष कालावधीत महानगरपालिकेस अंदाजे एकूण र.रू.१००० कोटी पर्यंतचे प्रकल्प स्मार्ट सिटी अभियानाचे निर्देशानुसार मंजूर होणार आहेत. त्यामध्ये शहरातील नागरीकांना पुरेसा पाणीपुरवठा, खात्रीशीर विज पुरवठा, शहर स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन, कार्यक्षम शहरी दळणवळण व सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, शहरी गरीबांसाठी परवडणारी घरे, सक्षम इंटरनेट सुविधा, शहरी आरोग्य आणि शिक्षण सुविधा, ई-गर्व्हनन्स व नागरीकांचा सहभाग, शाश्वत पर्यावरण, नागरीकांची सुरक्षा व संरक्षण इ. घटकांचा स्मार्ट सिटी अभियानाचे निधी अंतर्गत समावेश करणेत आलेला आहे.

केंद्र शासनामार्फत प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार स्मार्ट सिटी अभियानाच्या पहिल्या टप्प्यात केंद्र शासनाकडून कळविण्यात आलेल्या राज्यातील एक लक्षपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरातून स्पर्धात्मक पध्दतीने Smart City या योजनेसाठी महाराष्ट्रातील १० शहरांची निवड करून सदर शहरांची शिफारस केंद्र शासनाकडे केली जाणार आहे. केंद्र शासनाच्या Guidelines नुसार पुढीलप्रमाणे १ ते १३ निकषांची पुर्तता होणे आवश्यक आहे.

| अ.क्र | अपेक्षित कार्यवाही | गुण |
|---|---|---|
| १ | जनगनणा २०११ मधील वाढ झालेल्या किंवा स्वच्छ भारत अभियान आधाररेखानुसार (यापैकी जे कमित कमी असेल ते) शहरातील एकूण ११६८४ चे १०% ११६८ एवढी वैयक्तिक शौचालय उपलब्ध करणे. | १० |
| २ | ऑनलाईन तक्रार निवारण प्रणालीमार्फत तक्रारदारास तक्रारी वरील कार्यवाहीची माहिती उपलब्ध करणे. | ५ |
| ३ | मासिक ई-वार्तापत्र प्रसिध्द करणे. ( किमान मागील १ महिन्याचे प्रसिध्द झाले असणे आवश्यक) | ५ |
| ४ | महानगरपालिकेचे प्रकल्पनिहाय, गेल्या दोन आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक महानगरपालिकेच्यासंकेत स्थळावर वर प्रसिध्द करणे. | ५ |
| ५ | पुर्वनिर्धारीत वेळेपेक्षा सेवा देण्यास जास्तीचा कालावधी झाल्यास दंडात्मक कार्यवाही करणे. | ५ |
| ६ | सन २०१२ ते २०१५ या आर्थिक वर्षातील आंतरिक उत्पन्न वसुली व त्यामध्ये प्रतिवर्षातील वाढ. ( उदा. विविध कर, फी आणि शुल्क ) | १० |
| ७ | मागील महिन्यापर्यंत महानगरपालिका कर्मचा-यांची पगार अदायगी. | ५ |
| ८ | सन २०१२-१३ अखेरचे पुर्ण झालेले लेखापरिक्षण. | ५ |
| ९ | कर, महसूलशुल्क, भाडेशुल्क, वापरकर्ता शुल्कआणि इतर अंतर्गत महसूल स्रोत यांचे महानगरपालिका उत्पन्नातील योगदानटक्केवारी (आर्थिक वर्ष २०१४-१५) | १० |
| १० | पाणी पुरवठा आस्थापना आणि देखभाल खर्चाची टक्केवारी (आर्थिक वर्ष २०१४-१५) | १० |
| ११ | महानगरपालिकेचे स्वत: निर्माण केलेल्या उत्पन्नाच्या स्त्रोतातून भांडवली कामाकरीता वापरणेत आलेली खर्चाची टक्केवारी (आर्थिक वर्ष २०१४-१५) | १० |
| १२ | शहर पातळीवर जेएनएनयुआरएम रिफॉर्मस् साध्य उद्दीष्ठ टक्केवारी. (३१ मार्च २०१४ पर्यंत) | १० |
| १३ | जेएनएनयुआरएम अंतर्गत मंजुर प्रकल्पांपैकी पुर्ण झालेल्या प्रकल्पांची टक्केवारी.<br>(३१ मार्च २०१२ पर्यंत)<br>• राज्य शासनाकडून दि.३१/३/२०१४ पर्यंत सादर झालेल्या पुर्णत्वाचे दाखल्यानुसार | १० |
| | एकूण गुण | १०० |

उक्त नमुद १ ते १३ व्यतिरिक्त शहराचा समावेश स्मार्ट सिटी अभियानात करणेकरीता सक्षम समितीचे मान्य ठरावाची प्रत विहित नमुन्यातील फॉर्म सोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांची स्मार्ट सिटी अभियानाचे अनुषंगाने प्रभागनिहाय सभा घेऊन माहिती सादर करणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील झालेले आजपर्यंतचे कामकाज, ई-गर्व्हनन्सच्या माध्यमातून पुरविण्यात येणा-या सेवा सुविधा व शहरातील पायाभूत सुविधांचा विचार करता सदर शहराचा केंद्र शासनाच्या Smart City योजनेमध्ये समावेश होणे शहराच्या दृष्टीने प्रतिष्ठेचे व अभिमानास्पद आहे. सदर योजनेमध्ये पिंपरी चिंचवड शहराचा समावेश झाल्यास शहराची प्रतिमा अधिक उंचावण्यास मदत होईल. त्या दृष्टीने Smart City योजनेच्या निवड प्रक्रीयेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सहभाग घेणे आवश्यक आहे. याबाबतनिर्धारित करणेत आलेला विहित नमुन्यातील फॉर्म संपूर्ण माहितीसह राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे सादर करावा लागणार आहे. तदनंतर केंद्रशासनामार्फत निर्धारित केलेल्या गुणांकन पध्दतीनुसार त्याचे मुल्यमापन करून अहवाल तयार करणेत येऊन, त्यानुसार Smart City योजनेकरीता शहराची पात्रता ठरविण्यात येऊन निवड करणेत

येणार आहे. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक: स्मार्टसि-२०१५/प्र.क्र.१३०/नवि-३३ दि.०१ जुलै २०१५ अन्वये, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांच्या परिशिष्ठ -३ फॉर्म क्रमांक २ मधील विहित गुणांक तक्ता (स्कोअर कार्ड) मधील माहिती भरून सदर माहिती महानगरपालिका स्तरावर दि.१०जुलै २०१५ पर्यंत तयार ठेवणेबाबत कळविले आहे.

सदर अभियानासाठी केंद्र शासनाने निर्गतकेलेल्या Smart City Mission Statement & Guidelines चे निकषाप्रमाणे पिंपरी चिंचवड शहराच्या उक्त नमुद बाबींचे गुणांकन केंद्र शासनामार्फत करणेत येऊन पिंपरी चिंचवड शहाराचा Smart City योजनेत प्रत्यक्ष सहभाग निश्चीत होईल. सदर योजनेमध्ये शहराचा समावेश झाल्यास पाच वर्ष कालावधीमध्ये अंदाजे १००० कोटी रूपये निधी शहराचे विकास कामांसाठी उपलब्ध होणार आहे. त्यादृष्टीने Smart City योजनेमध्ये पिंपरी चिंचवड शहराचासहभाग होणेकरीता Smart City Mission Statement &Guidelines मधील फॉर्म क्र.२ मधील पार्ट क्र. ५ अन्वये विहित नमुन्यातील फॉर्म दि.१० जुलै २०१५ पर्यंत महाराष्ट्र शासनास पाठविणेकामी सक्षम समितीची मान्यता घेणे आवश्यक असलेने मा.महापालिका सभेकडे मान्यतेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९६७ विषय क्रमांक – ३८
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – अ क्षेत्रिय कार्यालय, आरोग्य
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अ.क्षे.का./आ/२/कावि/४६१/१५ दि.३०/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ क्षेत्रिय कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/२०१५-२०१६ अन्वये, अ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील कचरा, रस्त्याच्या कडेस व सार्वजनिक ठिकाणी साठणारा कचरा, रोजचे रोज उचलून वाहतुक करून महानगरपालिकेच्या मोशी कचरा डेपो येथे टाकणे व स्थानांतरण केंद्र भोसरी येथे टाकणेसाठी प्रती वाहन दोन खेपा (इंधनासह) + ४ मजुर एकूण ६ वाहनांकडून १२ खेपा प्रती दिन नेऊन टाकणे व पसरवून देणे कामी मे.आदर्श स्वयंसेवी संस्था, चिंचवड यांनी मोशी कचरा डेपोसाठी र.रु.३,१५६.८६ (प्रती वाहन प्रतीदिन २ खेपांसाठी) व भोसरी कचरा स्थानांतरण केंद्रासाठी र.रु.३,१६१.८५ (प्रती वाहन प्रतीदिन २ खेपांसाठी) याप्रमाणे सादर केलेले दर सर्वात कमी आहेत. (निविदा अंदाजपत्रकीय र.रु.९१,५४,५४८/-) सदर दराने त्यांची या कामी १ वर्ष कालावधीसाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करणे, त्यांचेशी आवश्यक अटी शर्तीचा करारनामा करुन कामाचे आदेश देणे व या कामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणे आवश्यक आहे. मे.आदर्श स्वयंसेवी संस्था, चिंचवड यांची निविदा लघुत्तम दराची निविदा आहे. त्यामुळे मे.आदर्श स्वयंसेवी संस्था यांना दर कमी करणेबाबत विचारणा केली असता त्यांनी दि.०१/०६/२०१५ रोजीचे पत्रान्वये प्रती दिन प्रती वाहन २ खेपा वाहन चालक + ४ मजूर + इंधनासह एकूण ६ वाहनांसाठी मोशी कचरा डेपोसाठी सादर केलेला निविदा दर र.रु.३१५६.८६ कमी करुन र.रु.३१५६/- (अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.५०% कमी) व भोसरी स्थानांतरण केंद्रासाठी सादर केलेला निविदा दर र.रु.३१६१.८५ कमी करुन र.रु.३१३०/- (अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.७१% कमी) याप्रमाणे दर सादर केलेले असून सदरचे दर स्विकृत करणेत आलेले आहेत. त्यानुसार मे.आदर्श स्वयंसेवी संस्था, चिंचवड यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक – ११९६८ विषय क्रमांक – ३९
दिनांक – ०७/०७/२०१५
सुचक –मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील मौजे सांगवी प्रभाग क्र.६० सांगवी गावठाण येथील विकास आराखड्यातील रस्ते विकसित करणेबाबत महानगरपालिका अंदाजपत्रकात तरतुद केलेली आहे. सांगवी गावठाण प्रभाग क्र.६० मधील कामांकरिता व त्याकरिता नियोजनबद्ध आराखडा करुन त्याप्रमाणे विकसित करणेबाबत सन २०१५- च्या अंदाजपत्रकात विकासकामांचा समावेश आहे. महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार रस्त्यामधील विविध सेवा वाहिन्या यांत दूरसंचार व म.रा.वि.वि.क. यांचेसह महानगरपालिकेच्या सर्व आवश्यक विभागांचे एकत्रित नियोजित मागणीनुसार विकसित करणे व स्थापत्य विभागाकडील कामाच्या बाबींचे पुर्वगणन तयार करणे व निविदा बनविणेसह कामाची देखरेख करणे इ. निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) कामे करावी लागणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपरोक्त संबंधित अशा विविध प्रकल्पांसाठी सल्लागार मे.पेव्हटेक कन्सल्टंट यांनी काम केले आहे. तसेच महानगरपालिकेच्या विविध रस्त्यांसाठी व बी.आर.टी.एस. रस्त्यांसाठी मे.पेव्हटेक कन्सल्टंट यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली कामे प्रगतीपथावर आहेत. या बाबींचा विचार करिता उपरोक्त विषयकामी प्रभाग क्र. ६० मधील विकासकामांसाठी मे.पेव्हटेक कन्सल्टंट (श्री.विकास ठाकर) यांची सल्लागार म्हणून नेमणूक करुन महानगरपालिकेच्या प्रचलित दरानुसार निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी स्विकृत निविदा किंमतीच्या (Accepted Tender Cost) 0.80% व निविदा (Pre Tender Activity) साठी 1.45% फी अधिक सेवाकर (Service Tax) इ. महानगरपालिकेच्या नियमानुसार देणेबाबत ठराव मंजुर करुन सदर कामाचे नियोजन करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९६९ विषय क्रमांक – ४०
दिनांक – ०७/०७/२०१५ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. पअक/२/कावि/३१६/२०१५ दि.७/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

देशातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करिता या शहरांना स्वच्छतेची आणि या शहरामधील सर्व नागरीकांना शौचालयांची सुविधा उपलब्ध करुन देवून हे ध्येय गाठण्यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार, हे अभियान २ ऑक्टोबर, २०१४ पासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जन्मदिनापर्यंत म्हणजे २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत संपूर्ण देशात राबविण्यात येत आहे. स्वच्छ भारत अभियान (नागरी) देशामध्ये एक अभियान म्हणून राबविण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने प्रसिध्द केल्या आहेत. त्याच धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अभियान राबविणे बाबत शासन निर्णय क्रमांक स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/नवि-३४ दिनांक १५/०५/२०१५ अन्वये संपूर्ण

महाराष्ट्रामध्ये राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मार्गदर्शक सुचनानुसार राज्यातील सर्व शहरांमधील उघड्यावर शौचालयास जात असलेल्या कुटुंबांना शौचालयाची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठी व शहरामधील घनकच-याचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्यामधील स्वच्छ भारत (नागरी) अभियान राबविण्यात येत असून सदर अभियानाचा कालावधी २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत राहणार आहे. सदर अभियानातील घटकांची अंमलबजावणी नगरविकास विभाग व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागा मार्फत संयुक्तपणे करणेत येणार आहे. सदर अभियानाचा प्रमुख उद्देश (१) उघड्यावरील शौचविधी बंद करणे.

**सदर अभियानातील प्रमुख घटक**

(अ) वैयक्तिक घरगुती शौचालय

(ब) सामुदायिक शौचालय

(क) सार्वजनिक शौचालय

(ड) घनकचरा व्यवस्थापन

(अ) माहिती शिक्षण व प्रसार आणि जनजागृती

(इ) क्षमता बांधणी आणि प्रशासकीय व कार्यालयीन खर्च

अशा प्रकारे आहे. उपरोक्त पैकी (अ) वैयक्तिक घरगुती शौचालय या घटकामध्ये राज्यातील सर्व शहरात कोणतेही कुटुंब उघड्यावर शौचास जाणार नाही, ही या अभियानाचे मुख्य वैशिष्ट्ये आहेत. शहरी भागात ४ फुट X ३ फूट आकाराचे वैयक्तिक शौचालय बांधण्याचा खर्च अंदाजे र.रु. २०,०००/- इतका आहे. या योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पात्र लाभार्थी कुटुंबास वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामासाठी केंद्रशासनाचे र.रु. ४,०००/- प्रति शौचालय व राज्य शासनाचे र.रु. ८,०००/- मिळून एकुण र.रु. १२,०००/- अनुदान अनुज्ञेय आहे. उपरोक्त अनुदानाव्यतिरिक्त उर्वरित अनुदान पुढील अन्य स्त्रोतामधून उपलब्ध करुन घेता येईल ते निधीचे स्त्रोत पुढील प्रमाणे आहेत.

१. खाजगी क्षेत्राचा सहभाग (Private Sector Participation)
२. राज्य सरकार / नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याव्दारे अतिरिक्त साधने (Additional Resources from State Government /ULB)
३. लाभार्थ्याचा सहभाग (Beneficiary Share)
४. वापरकर्ता शुल्क (Users Charges)
५. जमीन लिवरेजिंग (Land Leveraging)
६. अभिनव महसूल प्रवाह (Innovative revenue streams)
७. स्वच्छ भारत कोष (Swachh Bharat Kosh)
८. कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (Corporate Social Responsibility)
९. बाजारातील कर्ज (Market Borrowing)
१०. बाह्य सहाय्य (External Assistance)

यामधील मुद्दा क्र. २ नुसार मनपा मार्फत सहाय्यक अनुदान देणे तसेच मुद्दा क्रमांक ३ नुसार लाभार्थ्याचा सहभाग घेवून शहर स्वच्छता योजना यशस्वी होऊ शकते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसर हागणदारी मुक्त करणेसाठी मनपा हद्दीतील सर्व झोपडपट्ट्यांमध्ये अंदाजे ४०,००० झोपडपट्टी धारक **' सार्वजनिक शौचालय '** अथवा **' उघड्यावर शौच '** करतात अशी शक्यता आहे. मनपा मार्फत सार्वजनिक शौचालयांची देखभाल दुरूस्तीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करून देखील यापूर्वीचा अनुभव लक्षात घेता स्थानिक नागरिकांचे सहकार्य नसल्याने, सार्वजनिक शौचालयांची अवस्था चांगली रहात

नसल्याने त्यांचा पूरेपूर वापर न होता उघड्यावर शौच्यास बसणेच्या प्रवृत्तीमध्ये वाढ होत आहे. याचा विचार करता **मनपा परीसर हागणदारी मुक्त** करणेसाठी जास्तीत जास्त झोपडपट्टी धारकांना वैयक्तिक शौचालय उपलब्ध झाल्यास परीसर हागणदारी मुक्त होणेस मदत होऊ शकेल.

सबब स्वच्छ भारत अभियान अंतर्गत पिंपरी चिंचवड मनपा परीसर हागणदारी मुक्त करणेस स्वच्छ भारत अभियान (नागरी) तथा स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) द्वारे मिळाणा-या एकुण र.रू. १२,०००/- इतके अनुदान देणेत येणार आहे. यामध्ये केंद्र शासना कडील र.रू. ४,०००/- व महाराष्ट्र शासनाकडील र.रू. ८,०००/- रकमेचा समावेश आहे. तथापि शौचालय बांधणेस येणा-या खर्चाचा विचार करता उर्वरीत सूमारे र.रू.८,०००/- इतक्या रकमेची आवश्यकता असल्याने शहर हागणदारीमुक्त करुन नागरीकांच्या आरोग्याचा विचार करता शौचालय बांधणेसाठी आवश्यक लेबर चार्जेस लाभार्थ्यांचा **स्वहिस्सा** गृहीत धरुन मनपामार्फत वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी येणा-या उर्वरीत खर्चाच्या रकमेपैकी केंद्र शासनाकडून मिळणा-या अनुदान रकमे इतकेच म्हणजेच र.रू. ४,०००/- प्रति शौचालय इतके सहाय्यक अनुदान म्हणून देणेचे धोरणास व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९७० विषय क्रमांक – ४१

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

“ड” प्रभाग व “ड” मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१३,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९७१ विषय क्रमांक – ४२

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१७,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९७२ विषय क्रमांक – ४३

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,६०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ११९७३ विषय क्रमांक – ४४

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,४०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९७४ विषय क्रमांक – ४५

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९७५ विषय क्रमांक – ४६

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

फ क्षेत्रीय कार्यालय मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – ११९७६ विषय क्रमांक – ४७

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ :- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

“ब” प्रभागातील सन २०१५-१६ च्या मुळ अंदापत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ / घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११९७७ विषय क्रमांक – ४८

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ :- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

फ क्षेत्रीय कार्यालयातील मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदापत्रकामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रु.८,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ११९७८ विषय क्रमांक – ४९

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ :- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कार्यक्षेत्रीतील कनिष्ठ अभियंता व उपअभियंता विकास कामांच्या देखरेखीसाठी आहेत या अधिकारी कर्मचा-यांना वेळोवेळी येणा-या नागरिकांच्या तक्रारींचे नियंत्रण, मंडप परवाना, तसेच सर्व स्थापत्य विषयक कामांवर अंदाजपत्रके तयार करुन गुणात्मक नियंत्रण ठेवणे, संबंधितांना कामाच्या बिलाची अदायगी करणे, अशी अनेक प्रकारची कामे असल्याने विकास कामांवर दैनंदिन नियंत्रण ठेवणे जिकीरीचे होत आहे. मा.आयुक्त यांनी विचारणा केल्याप्रमाणे सदर कामांसाठी निविदा पश्चात सदर कामांवर दैनंदिन देखरेख ठेवणे, कामांची प्रगती, गुणवत्ता मोजणे, कामांची बीले तयार करणे, व विविध कार्यालयीन कामकाजासाठी विविध विभागात समन्वय साधणेसाठी तसेच विविध अद्ययावत विषय संकल्पना यांचा महानगरपालिका कामांमध्ये अंतर्भाव असणे ही आता काळाची गरज आहे. त्यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्स्लटंसी नेमणे आवश्यक आहे. सदर बाबीचा विचार करता मे./श्री.विजयकुमार बाळासाहेब पवार यांची आर्किटेक्ट म्हणून तसेच निविदा पश्चात सदर कामांवर दैनंदिन देखभाल, नियंत्रण ठेवणेसाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्स्लटंट म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११९७९ विषय क्रमांक – ५०

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ :- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

इ क्षेत्रिय (प्रभागातील) कार्यालयातील भोसरी उपविभागातील टाक्यांवरुन पाणीपुरवठा करण्यासाठी मजूर पुरविणे (निविदा नोटीस क्र.८/२६- २०१४-१५) मे.शुभम उद्योग यांचेमार्फत चालू असून त्यांची कामाची मुदत २६/०२/२०१६ पर्यंत आहे. परंतु त्यासाठी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात ३०,००,०००/- इतकी तरतुद केलेली असून कामाची निविदा र.रु.४२,४३,२६६/- इतकी असून हा खर्च जुलै २०१५ पर्यंत पुर्ण होईल. तसेच सद्यस्थितीत नविन निविदा काढण्याची प्रक्रीय चालू असून तोपर्यंत निविदा उघडून कामाचे आदेश देणेपर्यंत मनपाकडे पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे व मे.शुभम उद्योग यांचा कामाचा अनुभव चांगला असल्यामुळे व पाणीपुरवठा विस्कळीत होवू नये म्हणून नविन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत मे. शुभम उद्योग यांचेकडून काम करुन घेण्यास व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास व होणा-या खर्चासाठी लागणारी तरतूद प्रस्तावात नमुद प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.४०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११९८० विषय क्रमांक – ५१

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ :- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्रमांक १३ निगडी गावठाण येथील सेक्टर क्र.२२ मधील जकात नाक्याशेजारील बी.आर.टी.एस.बस टर्मिनल लगत लोकशाहीर कै.आण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा बसवावयाचा असून त्याकामी सन २०१५-१६ चे मंजूर अंदाजपत्रकात र.रु.२०,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे. परंतु सदरची तरतूद अपुरी पडत असल्याने अंदाजपत्रकातील इतर लेखाशिर्षामधून याकामी र.रु.८७,००,०००/- वर्ग करावे लागणार आहेत. त्यासाठी प्रस्तावात नमुद प्रमाणे अंदाजपत्रकीय रकमेत वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.८७,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११९८१ विषय क्रमांक – ५२

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ :- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड मनपा माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत माध्यमिक विद्यालयात इ.८ वी, ९ वीच्या विद्यार्थ्यांना हस्ताक्षर सुधारणा प्रकल्पाबाबतच्या ठरावास मान्यता देऊन १८ शाळा पुर्ण होईपर्यंतचा आदेश देण्यात यावा. १०० विद्यार्थी लाभ घेणार असतील तर र.रु.१२,०००/- व त्यापेक्षा जास्त असतील तर र.रु.१५,०००/- प्रती महा एकत्रित मानधन संबंधीत मार्गदर्शकांना देण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११९८२ विषय क्रमांक – ५३

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ :- मा.सविता साळुंके, मा.अनिता तापकीर यांचा प्रस्ताव...

फ क्षेत्रीय कार्यालयातील मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदापत्रकामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.६०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११९८३ विषय क्रमांक – ५४

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.धनंजय आल्हाट

संदर्भ :- मा.बाळासाहेब तरस, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ११९१५, ११९१६, ११९१७ दिनांक ३०/०६/२०१५ रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ११९८४ विषय क्रमांक – ५५

दिनांक – ०७/०७/२०१५

सुचक – मा.अनिता तापकीर अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ :- मा.अनिता तापकीर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.११९०४ दिनांक ३०/६/२०१५ रद्द करण्यात यावा व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.६०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/६७/२०१५
दिनांक - ०७/०७/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.